सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन १९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८**

# मुंबई जमीन सुधारणा परियोजना अधिनियम, १९४२

**(दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ पर्यंत सुधारित)**

**BOMBAY Act No. XXVIII OF 1942**

# The Bombay Land Improvement Schemes Act, 1942

(*As modified upto the 31st October, 2012*)

*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक,
शासन मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४ यांच्याद्वारे प्रकाशित.
**२०१३**

(किंमत ९.०० रुपये)

# मुंबई जमीन सुधारणा परियोजना अधिनियम, १९४२

**अनुक्रमणिका**

**उद्देशिका.**

प्रकरण एक

**प्रारंभिक**

कलमे

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

२. व्याख्या.

प्रकरण दोन

**मंडळाची रचना व जमीन सुधारणा परियोजना तयार करणे**

३. मंडळाची रचना.

४. जमीन सुधारणा परियोजना तयार करण्याविषयी निदेश देण्याचा मंडळाचा किंवा कंपनीचा अधिकार व ज्यासाठी परियोजना तयार करता येईल अशा बाबी.

५. परियोजना प्रसिद्ध करणे व आक्षेप मागविणे.

६. चौकशी अधिका-याचा किंवा कंपनी अधिका-याचा अहवाल.

७. [निरसित].

८. [निरसित].

९. परियोजना फेरबदलासह किंवा फेरबदलाविना मंजूर करण्याचा मंडळाचा किंवा कंपनीचा अधिकार.

१०. परियोजनेचा परिणाम.

१० अ. राज्य शासनाचा किंवा मंडळाचा किंवा कंपनीचा विनियम करण्याचा अधिकार.

प्रकरण तीन

**परियोजनेची अंमलबजावणी**

११. परियोजना अंमलात आणण्याचा अधिकार.

१२. ज्यांच्या जमिनी परियोजनेत समाविष्ट नाहीत अशा व्यक्तींचे अंशदान देण्याचे दायित्व.

१२ अ. शास्ती.

प्रकरण चार

**परियोजनेखाली पार पाडण्यात आलेली कामे सुस्थितीत ठेवणे, त्यांची दुरुस्ती करणे व त्यांचा उपयोग करणे**

१३. विवरण पत्र.

१३ अ. कार्यकारी अधिका-याने वसुली विवरण तयार करणे आणि हक्कदारपत्र इत्यादींत नोंदी करणे.

१४. कामे सुस्थितीत ठेवणे आणि दुरुस्त करणे याबाबत व्यक्तींवरील आबंधन.

**अनुक्रमणिका**—(चालू)

प्रकरण पाच

**संकीर्ण**

कलमे

१५. रकमेचा भरणा व वसुली.

१५ अ. कंपनीला देय असलेली रक्कम ही कसुरदाराच्या जमिनीवरील पहिला भार असणे.

१५ ब. कंपनीस येणे असलेल्या रकमेची जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुली.

१५ क. अनुसूचित बँकेने कर्ज दिले असेल त्याबाबतीत, लाभग्राही जमीन मालकाकडून येणे रकमांची त्वरेने वसुली होण्यासाठी कंपनीचे हक्क बँकेकडे हस्तांतरित करणे.

१६. प्रवेश करण्याचा हक्क.

१७. संक्षिप्तरीत्या चौकशी करणे.

१८. करण्यात आलेल्या सुधारणांमुळे खंड वाढविण्याची मालकास परवानगी.

१९. जमीन सुधारणा परियोजनेसंबंधीचा दस्तऐवज, आराखडा किंवा नकाशा यांची नोंदणी करण्याची आवश्यकता नाही.

२०. [निरसित].

२१. प्रत्यायोजन.

२२. विवक्षित अधिकारी लोकसेवक असणे.

२३. सद्भावपूर्वक काम करणा-या व्यक्तींना संरक्षण आणि दावा व खटल्याची मुदत.

२४. नियम तयार करण्याचा अधिकार.

२५. विवक्षित परिस्थितीमध्ये परियोजना तयार करण्याबद्दल निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

२५ अ. टंचाईग्रस्त क्षेत्र म्हणून जाहिर करण्यात आलेल्या क्षेत्रामध्ये परियोजना तयार करण्याचा आणि तिची अंमलबजावणी करण्याचा निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

२५ ब. परियोजना प्रत्याहृत करण्याचा अधिकार.

२६. राज्य शासनाने केलेल्या खर्चाचा भार राज्याच्या एकत्रित निधीवर असणे.

२६ अ. शासनाचे हक्क व दायित्वे कृषि व ग्रामीण विकास बँकेकडे हस्तांतरित केल्याचा परिणाम.

२६ ब. परियोजना कंपनीकडे हस्तांतरित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

२७. व्यावृत्ती.

२८. मंडळाची रचना व कार्यवाही विधिग्राह्य ठरवणे.

२८ अ. निरसन व व्यावृत्ती.

२९. खार जमिनींची व्यावृत्ती.

# * सन १९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८[१]

## [मुंबई जमीन सुधारणा परियोजना अधिनियम, १९४२] †

[दि. १५ जानेवारी, १९४३ रोजी गव्हर्नर जनरल यांची अनुमती मिळाली; ही अनुमती **मुंबई शासन राजपत्र** यामध्ये दिनांक २५ जानेवारी, १९४३ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध करण्यात आली.]

या अधिनियमात पुढील अधिनियम व आदेश यां अन्वये सुधारणा, अनुकूलन व फेरबदल करण्यात आले.

सन १९४४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३*

सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७ *[२]

सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७३

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३८

हा अधिनियम सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५३ अन्वये अंशतः निरसित करण्यात व सुधारण्यात आला.

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८.

सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३०.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५.

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ ‡

सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ **§**

सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ (१३-७-१९७३) ¶

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ (१५-९-१९७६) ¶

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ (१५-४-१९७७) ¶

सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ (३१-१२-१९७९) **@**

सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ (७-८-१९८९) ¶

---

[१] निवेदनासाठी मुंबई शासन राजपत्र, १९४३, भाग चार, पृष्ठ ४४ (इंग्रजी) पहा.

[२] या अधिनियमाच्या भूतलक्षी प्रवर्तनासाठी सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम २२ पहा.

* हे अधिनियम सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ अन्वये निरसित व पुनः अधिनियमित करण्यात आले.

† हा अधिनियम सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३० याच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी मुंबई राज्याच्या ज्या भागास लागू नव्हता त्या भागाला लागू करण्यात आला (सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३०, कलम २ पहा).

‡ सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ४ अन्वये सन १९६९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक अकरा निरसित करण्यात आला.

**§** सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४, कलम ३ अन्वये सन १९७२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक दहा निरसित करण्यात आला.

¶ ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शवते.

**@** सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ४ अन्वये सन १९७९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक बारा निरसित करण्यात आला.

**मुंबई प्रांतातील जमिनी व पिके यांचे संरक्षण व सुधारणा व्हावी म्हणून तलाव, बंधारे व इतर कामे यांच्या बांधकामाच्या संबंधात मृदसंरक्षणाच्या प्रयोजनासाठी चराईबाबत मनाई करणे व त्यावर नियंत्रण ठेवणे, मृद अपक्षरणास प्रतिबंध करणे, पाणीपुरवठ्यात सुधारणा करणे व इतर बाबी यांच्या संबंधात परियोजना करणे व त्या पार पाडणे याबाबत, तसेच प्रांताच्या महसुलावर विवक्षित खर्चाचा भार टाकणे याबाबत तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** मुंबई प्रांतातील जमिनी व पिके यांचे संरक्षण व सुधारणा व्हावी म्हणून तलाव, बंधारे व इतर कामे यांच्या बांधकामाच्या संबंधात, मृदसंरक्षणाच्या प्रयोजनांसाठी चराईबाबत मनाई करणे व त्यावर नियंत्रण ठेवणे, मृद अपक्षरणास प्रतिबंध करणे, पाणीपुरवठ्यात सुधारणा करणे व इतर बाबी यांच्या संबंधात परियोजना करणे व त्या पार पाडणे याबाबत, तसेच प्रांताच्या महसुलावर विवक्षित खर्चाचा भार टाकणे याबाबत तरतूद करणे इष्ट आहे;

**आणि ज्याअर्थी,** मुंबईचे गव्हर्नर यांनी गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९३५, कलम ९३ खाली काढलेल्या, दिनांक ४ नोव्हेंबर, १९३९ रोजीच्या उद्‌घोषणेखाली उक्त अधिनियमान्वये किंवा त्याखाली प्रांतिक विधानमंडळामध्ये विहित असलेले सर्व अधिकार ग्रहण केले आहेत;

**त्याअर्थी, आता**, उक्त अधिकारांचा वापर करून, मुंबईचे गव्हर्नर यांनी पुढीलप्रमाणे अधिनियम केला आहे :—

## प्रकरण एक
### प्रारंभिक

संक्षिप्त नाव,व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई जमीन सुधारणा परियोजना अधिनियम, १९४२ असे म्हणावे.

[१][ (२) तो, संपूर्ण [२] [महाराष्ट्र राज्यास] लागू असेल.]

(३) तो [३] [राज्य] शासन शासकीय **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे निदेश देईल अशा क्षेत्रात व अशा दिनांकास अंमलात येईल :

१९५८ चा मुंबई ३०. १९५३ चा हैदराबाद १९.

[४] [परंतु, मुंबई जमीन सुधारणा परियोजना (व्याप्ती वाढविणे व सुधारणा) अधिनियम, १९५८ याचा प्रारंभ झाल्यावर तो, अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी हैदराबाद जमीन सुधारणा अधिनियम, १९५३ [५][***] ज्या क्षेत्रात अंमलात होता त्या क्षेत्रात ताबडतोब अंमलात येईल.]

---

[१] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३०, कलम ३ (१) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[२] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये " मुंबई राज्यास " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३०, कलम ३ (२) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[५] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये " किंवा यथास्थिति, सौराष्ट्र जमीन सुधारणा परियोजना अधिनियम, १९५४ " हे शब्द वगळण्यात आले.

**२.** विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर, या अधिनियमात,— व्याख्या.

(१) " मंडळ " म्हणजे, कलम ३ खाली रचना करण्यात आलेले मंडळ;

१९६६ चा महा. ४१. [१][ (१ अ) " संहिता " म्हणजे, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ ; ]

[२][ (१ ब) " कंपनी " म्हणजे, या अधिनियमाखाली अंमलात आल्या असतील अशा परियोजना पार पाडण्याच्या किंवा त्यांना भांडवल पुरवण्याच्या प्रयोजनासाठी (किंवा या दोन्ही प्रयोजनांसाठी) प्रस्थापित करण्यात आली असेल अशी राज्याच्या मालकीची किंवा त्याचा नियंत्रणाधीन असलेली कंपनी ;

(१ क) " कंपनी अधिकारी " म्हणजे, कंपनीचे या अधिनियमांच्या सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी कंपनीने रीतसर नेमलेला तिचा कोणताही अधिकारी ; ]

[३][ (२) " कृषी संचालक " म्हणजे, कृषी संचालक म्हणून त्या त्या वेळी नेमण्यात आलेला अधिकारी व यात या अधिनियमाखाली कृषी संचालकाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी [४][राज्य] शासनाने नेमलेल्या कोणत्याही अधिका-याचा समावेश होतो ;

(२ अ) " विभागीय मृद संधारण अधिकारी " म्हणजे, विभागीय मृद संधारण अधिकारी म्हणून त्या त्या वेळी नेमण्यात आलेला अधिकारी ; ]

१९६२ चा महा. ५. [५][ (२ ब) " जिल्हा कृषी अधिकारी " म्हणजे, जिल्हा कृषी अधिका-याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी राज्य शासनाने नेमलेला महाराष्ट्र जिल्हा परिषदेचा (महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ या खाली रचना केलेल्या), कोणताही अधिकारी ;

[६][ (२ क) " कार्यकारी अधिकारी " म्हणजे, कलम ११, पोटकलम (१) खाली मंडळाने [७][किंवा कंपनीने] नेमलेला अधिकारी ;] [८][आणि " कार्यकारी अधिकारी " या शब्दप्रयोगाचा अन्वयार्थ राज्य शासनाच्या किंवा कंपनीच्या खर्चाने परियोजना कार्यान्वित करण्यात येतील त्यानुसार लावण्यात येईल ; ]

(३) " चौकशी अधिकारी " म्हणजे, मंडळाने चौकशी अधिकारी म्हणून नेमलेला अधिकारी ;

---

[१] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ च्या कलम २ (अ) अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (१अ) दाखल करण्यात आला.

[२] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम २ (१) अन्वये खंड (१ब) व खंड (१क) समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७३, कलम २ अन्वये खंड (२) व (२अ) बदली दाखल करण्यात आले.

[४] विधि अनुकूलन आदेश , १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम २८६, दहावी अनुसूची अन्वये खंड (२ब) दाखल करण्यात आला.

[६] सन १९४८ च्या मुंबई अधिनियम क्रमांक ७३, कलम २ (ब) अन्वये खंड २ (अ) ला २ (क) हा फेरक्रमांक देण्यात आला आणि तो खंड सन १९४५ च्या मुंबई अधिनियम क्रमांक ७ कलम (२अ) आणि १९४८ च्या मुंबई अधिनियम क्रमांक २९, कलम २ अन्वये समाविष्ट करण्यात आला.

[७] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम २ (२) (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[८] वरील अधिनियमांच्या वरील कलमान्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[१][ (४) " मालक " या संज्ञेत पृथकपणे सामाईक अथवा संयुक्त असणारा मालक, भोगवटादार, भूधृतिधारक, पट्टेदार, कूळ, कब्जे-गहाणदार, यांचा समावेश होतो आणि " मालकीचे असलेले " व " मालकी असणे " या शब्दप्रयोगांचा अन्वयार्थ त्यानुसार लावण्यात येईल ;]

(५) " विहित " म्हणजे, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांनी विहित केलेले ;

[२][ (५ अ) * * * ]

[३][ (५ ब) संबंधित कुळवहिवाट कायदा म्हणजे,—

१९४८ चा मुंबई ७२. (एक) महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रामध्ये मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ ;

१९५८ चा मुंबई ९९. (दोन) महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ प्रदेशामध्ये, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम, १९५८ ; आणि

१९५० चा हैदराबाद २१. (तीन) महाराष्ट्र राज्याच्या हैदराबाद क्षेत्रामध्ये, हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९५०;]

१९३४ चा २. [४][ (६) " अनुसूचित बँक " म्हणजे, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अधिनियम, १९३४ याच्या दुस-या अनुसूचीमध्ये अंतर्भूत असलेली बँक आणि अशा बँकेच्या संबंधात " बँक अधिकारी " म्हणजे या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता बँकेने रीतसर नेमलेला कोणताही अधिकारी ;]

(७) " परियोजना " म्हणजे, या अधिनियमाखाली तयार केलेली जमीन सुधारणा परियोजना ;

[५][ (७ अ) " मृद संधारण अधिकारी " म्हणजे, त्या त्या वेळी मृद संधारण अधिकारी म्हणून नेमलेला अधिकारी ;]

[६][ (७ ब) " कूळ " म्हणजे, संबद्ध कुळवहिवाट कायद्याच्या अर्थांतर्गत कूळ ;]

(८) या अधिनियमात वापरण्यात आलेले, पण व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना [७][संहितेत] त्यांना ठरवून दिलेला अर्थ असेल.

---

[१] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३०, कलम ४ (२) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[२] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (ब) अन्वये खंड (५अ) वगळण्यात आला.

[३] १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (क) अन्वये मूळ खंडाऐवजी खंड ५ (ब) दाखल करण्यात आला.

[४] सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम २ अन्वये पोटकलम (६) समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७३, कलम २ (ड) अन्वये खंड (७ अ) व खंड (७ ब) समाविष्ट करण्यात आले.

[६] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३०, कलम ४ (४) या अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला ;

[७] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (ड) अन्वये "संबंद्ध जमीन महसूल अधिनियम " या मजकुराऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

## प्रकरण दोन

### मंडळाची रचना व जमीन सुधारणा परियोजना तयार करणे.

**३.** [१][(१) [२][राज्य] शासन, प्रत्येक जिल्ह्यात एका मंडळाची रचना करील. हे मंडळ जिल्हाधिकारी, जिल्हा कृषि अधिकारी, विभागीय मृद संधारण अधिकारी व [२][राज्य] शासन नेमील अशा [३][पाच पेक्षा अधिक नसतील अशा] अशासकीय व्यक्ती यांचे मिळून बनलेले असेल. मंडळांची रचना.

(१ अ) विभागीय मृद संधारण अधिकारी हा, मंडळाचा सचिव असेल.]

(२) मंडळाच्या सदस्यांत या अधिनियमाच्या तरतुदीखालील कोणत्याही प्रश्नाबाबत मतभिन्नता असल्यास, बहुमताचा निर्णय ग्राह्य धरला जाईल.

**४. (१)** [४][मंडळ किंवा कंपनी] आपल्या अधिकारितेतील कोणत्याही क्षेत्राची जमीन सुधारणा परियोजना तयार करण्याविषयी निदेश देऊ शकेल. परियोजनेत खालीलपैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :— जमीन सुधारणा परियोजना तयार करण्याविषयी निदेश देण्याचा [१२][ मंडळाचा किंवा कंपनीचा] अधिकार व ज्यासाठी परियोजना तयार करता येईल अशा बाबी.

(एक) मृद संरक्षण व सुधारणा ;

(दोन) मृद अपक्षरणास प्रतिबंध ;

(तीन) पाणी पुरवठ्याची सुधारणा [५][यात विहिरी व जमिनीखालील जलसंपत्तीची इतर साधने याचे बांधकाम किंवा त्यात सुधारणा करणे आणि अशा जलसंपत्तीचे समुपयोजन करणे या गोष्टी अंतर्भूत आहेत ;]

[६][(तीन-अ) या परियोजनेत विनिर्दिष्ट करावयाच्या संभाव्य जलसिंचनाच्या अधिक चांगल्या वापरासाठी जमिनीचा विकास करणे ;

(चार) कोरडवाहू शेती पद्धती सुरु करणे ;

(पाच) लागवड पद्धतीत सुधारणा करणे ;

(सहा) पाणथळ जमीन किंवा समुद्रव्याप्त जमीन लागवडयोग्य करणे ;

(सात) चराईस मनाई किंवा तिचे नियंत्रण ;

(आठ) झाडांच्या वाढीवर नियंत्रण ठेवणे व त्याबाबत परिरक्षण करणे ;

[७][(आठ अ) झाडेझुडपे जाळण्याबाबत विनिमय किंवा प्रतिबंध ;]

[८][(आठ ब) वैराण किंवा पडीत जमिनीची लागवड करणे ;]

[९][(आठ क) लागवडीला हानिकारक ठरेल किंवा अडथळा होण्याचा संभव असेल अशी हरळी किंवा इतर कोणत्याही प्रकारचे तण किंवा झाडेझुडपे समूळ नष्ट करणे ;]

(नऊ) विहित करण्यात येतील अशा या अधिनियमाच्या उद्देशांशी विसंगत नसणा-या इतर बाबी.

[१०][ (२) [११][मंडळाने किंवा कंपनीने] असे निदेश दिल्यावर [११][मंडळ किंवा कंपनी] ते/ती देईल अशा निर्देशानुसार पुढील तपशील असलेली प्रारुप परियोजना तयार करण्यासाठी एका अधिका-याची नेमणूक करील :—

(एक) परियोजनेची उद्दिष्टे ;

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७३, कलम ३ अन्वये पोट-कलम (१) ऐवजी पोटकलमे (१) व (१अ) दाखल करण्यात आली.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ च्या कलम ३ अन्वये " दोनपेक्षा अधिक नाही इतके " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ३ (१) (अ) अन्वये "मंडळ "या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ३ (१) (ब) अन्वये हा भागांश जादा दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ३ (१) (क) अन्वये खंड (तीन अ) समाविष्ट करण्यात आला.

[७] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ४ (एक) आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, कलम २ अन्वये खंड (आठ अ) समाविष्ट करण्यात आला.

[८] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७३, कलम ४ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[९] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३८, कलम २ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[१०] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, खाली कलम ४ (तीन) आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, कलम २ अन्वये पोट-कलम (२) बदली दाखल करण्यात आले.

[११] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ३ अन्वये, " मंडळाने " आणि " मंडळ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१२] वरील अधिनियमाच्या कलम ३ (३) अन्वये, " मंडळाचा " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

(दोन) परियोजनेत समाविष्ट करावयाचे जमिनीचे अंदाजे क्षेत्र ;

(तीन) परियोजनेखाली पार पाडावयाचे काम किंवा कामाचा प्रकार ;

(चार) ज्यांच्यामार्फत ते काम पार पाडले जाईल ते अभिकरण किंवा ती अभिकरणे ;

(पाच) विहित करण्यात येईल असा इतर तपशील.]

परियोजना प्रसिद्ध करणे व आक्षेप मागवणे.

[१][ **५.** (१) मंडळ किंवा कंपनी, कलम ४ खाली तयार केलेली प्रारुप परियोजना **शासकीय राजपत्रात** आणि जेथील जमिनी उपरोक्त परियोजनेत समाविष्ट करण्याचे योजिले असेल त्या गावात आणि त्या तालुक्याच्या व जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी प्रसिद्ध करील.

(२) मंडळ किंवा कंपनी ही, परियोजना **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करील तेव्हाच या परियोजनेची बाधा पोहोचलेल्या ज्या व्यक्तींची परियोजनेला किंवा तिच्या काही भागाला कोणताही आक्षेप घेण्याची इच्छा असेल त्या सर्व व्यक्तींनी परियोजना प्रसिद्ध केल्यापासून एकवीस दिवसांच्या आत आपले लेखी आक्षेप मंडळाने नेमलेल्या चौकशी अधिका-याकडे किंवा कंपनी अधिका-याकडे सादर करण्यास किंवा त्याच्यासमोर प्रत्यक्ष हजर राहण्यास फर्मावील.]

चौकशी अधिका-याचा [३][किंवा कंपनी अधिका-याचा] अहवाल.

[२][ **६.** (१) चौकशी अधिकारी [३][किंवा कंपनी अधिकारी] त्यास जातीने सादर करण्यात आलेले आक्षेप ऐकून घेईल, कलम ५ खाली रीतसर सादर करण्यात आलेल्या सर्व आक्षेपांचा विचार करील व आपला अहवाल आक्षेपांसह मंडळास [३][किंवा, यथास्थिति कंपनीस] सादर करील.

(२) चौकशी अधिका-याला [१][किंवा कंपनी अधिका-याला], पोटकलम (१) खाली आपला अहवाल सादर करताना [४][* * * *] परियोजनेतील तपशिलात त्याच्या मते जे कोणतेही फेरबदल आवश्यक असतील त्याबाबत शिफारस करता येईल.

**७.** (वादग्रस्त हक्कमागण्यांचा निकाल) सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ६ आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, कलम २ अन्वये निरसित करण्यात आले.

**८.** (चौकशी अधिका-याचा अहवाल) सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ६ आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, कलम २ अन्वये निरसित करण्यात आले.

---

[१] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ४, अन्वये मूळ कलम ५ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[२] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ५ अन्वये कलम ६ बदली दाखल करण्यात आले.

[३] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ५ (२) (ब) अन्वये "कलम ५ च्या पोटकलम (१) खाली मंडळाने मान्य केलेल्या" हा मजकूर वगळण्यात आला.

[१][**९.** (१) कलम ६, पोट कलम (१) खाली सादर केलेला अहवाल व आक्षेप आणि [मंडळ किंवा कंपनी] चौकशी अधिका-याला किंवा कंपनी अधिका-याला फर्मावील त्याप्रमाणे सादर करण्यात आलेला आणखी कोणताही अहवाल यांचा विचार केल्यानंतर [२][मंडळ किंवा यथास्थिति, कंपनी] ती परियोजना फेरबदलासह किंवा फेरफारबदलाविना मंजूर किंवा नामंजूर करील; परियोजना फेरबदलासह किंवा फेरबदलाविना मंजूर करण्याचा ३[मंडळाचा किंवा कंपनीचा] अधिकार.

परंतु जर परियोजनेत समाविष्ट केलेल्या जमिनीच्या [४][शासनाहून] अन्य मालकांपैकी ३३ टक्क्यांहून कमी नाहीत इतके मालक किंवा परियोजनेत अंतर्भूत असलेल्या जमिनीच्या क्षेत्रफळाच्या ३३ टक्क्यांहून कमी नाहीत इतक्या एकूण जमिनीचे [४][शासनाहून] अन्य मालक परियोजनेस किंवा तिच्या भागास आक्षेप घेतील, तर [५][यथास्थिती मंडळ किंवा कंपनी] ही परियोजना [६][राज्य] शासनास, त्याने त्यावर आदेश द्यावा म्हणून सादर करील. त्यानंतर [६][राज्य] शासन ती परियोजना फेरबदलासह किंवा फेरबदलाविना मंजूर किंवा नामंजूर करील.

(२) पोट कलम (१) खाली मंजूर करण्यात आलेली परियोजना **शासकीय राजपत्रात** आणि परियोजनेत समाविष्ट केलेल्या जमिनी ज्या गावात असतील त्या [७][तालुका [८][ * * * *] व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी प्रसिद्ध करण्यात येईल अशी प्रसिद्ध करण्यात आलेली परियोजना अंतिम असेल.

**१०.** कलम ९ च्या पोट-कलम [९][ (२) ] खाली ही परियोजना **शासकीय राजपत्रात** ज्या दिनांकास प्रसिद्ध करण्यात येईल त्या दिनांकास ती अंमलात येईल आणि जणू काही ती या अधिनियमात अधिनियमित करण्यात आली असावी त्याप्रमाणे परिणामक असेल. परियोजनेचा परिणाम.

---

[१] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ७, आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, कलम २ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[२] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ६ (१) (अ) अन्वये मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ६ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " बादशहा " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ६ (१) (ब) अन्वये मूळ शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[६] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[७] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३०, कलम ६ अन्वये " तालुका " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[८] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ६ (२) अन्वये " तहसील किंवा महाल " हे शब्द वगळण्यात आले.

[९] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ८ आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, कलम २ अन्वये " (३) या आकड्या ऐवजी " " (२) " हा आकडा दाखल करण्यात आला.

[३][राज्य] शासनाचा किंवा [६][मंडळाचा किंवा कंपनीचा] विनियम करण्याचा अधिकार.

[१][**१०.** अ. कलम १०, खाली जी परियोजना अंमलात आली असेल त्या परियोजनेची उद्दिष्टे पार [२][पाडण्याच्या प्रयोजनार्थ [३][राज्य] शासनास किंवा] मंडळास [४][किंवा कंपनीस] विनियम करून त्याद्वारा कोणत्याही व्यक्तीस किंवा [५][* * *] व्यक्तींना किंवा एकूण जनतेला परियोजनेस पूरक किंवा आनुषंगिक असलेल्या कोणत्याही बाबींच्या संबंधात विवक्षित कृती करण्यास किंवा विवक्षित कृती करण्यापासून परावृत्त राहण्यास फर्मावता येईल. [४][मंडळ किंवा कंपनी तयार करील असे विनियम हे, राज्य शासनाशी विचारविनिमय करून तयार करण्यात येतील].

## प्रकरण तीन

### परियोजनेची अंमलबजावणी

परियोजना अंमलात आणण्याचा अधिकार.

[७][**११.** (१) कलम १० खाली परियोजना अंमलात आल्यानंतर मंडळ [८][किंवा, यथास्थिति, कंपनी] तिची अंमलबजावणी करण्यासाठी अधिका-याची नेमणूक करील.

(२) परियोजनेत अंतर्भूत करण्यात आलेल्या जमिनीचा प्रत्येक मालक त्याच्या जमिनीत [९][शासनाने] [२][किंवा यथास्थिति, कंपनीने] परियोजनेखाली पार पाडलेल्या कामाचा परिव्यय किंवा परिव्ययाचा भाग हा त्या मालकाचा परिव्यय किंवा परिव्ययाचा भाग असावा त्याप्रमाणे चुकता करील.

(३) परियोजनेत अंतर्भूत असलेल्या जमिनीचा एखादा मालक, जी कामे परियोजनेखाली [९][शासनाने] [१०][किंवा, यथास्थिति, कंपनीने] त्या मालकाच्या परिव्ययाने किंवा आंशिक परिव्ययाने त्याच्या जमिनीत पार पाडावयाची असतात ती कामे स्वतः करू इच्छित असेल तर तो तशा आशयाची नोटीस, कार्यकारी अधिका-यास, कलम ९ खाली ही परियोजना **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केल्यापासून एकवीस दिवसांच्या आत देईल.

(४) अशी नोटीस मिळाल्यावर कार्यकारी अधिकारी त्या मालकाला त्याच्या जमिनीवर पार पाडावयाच्या कामाची माहिती देईल आणि ती कामे ज्या तारखेपूर्वी पार पाडावयाची ती तारीख निश्चित करील.

---

[१] सन १९४४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३, कलम २, आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, कलम २ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ९, आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, कलम २ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ कलम ७ (१) अन्वये " मंडळ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७३, कलम ६ अन्वये " वर्गातील " हे शब्द वगळण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ७ (२) अन्वये "मंडळाचा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम १० आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, कलम २ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[८] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ८ अन्वये हे शब्द दाखल करण्यात आले.

[९] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " बादशहा " या शब्दाऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[१०] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ८ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(५) जर मालकाने, कोणतेही काम कार्यकारी अधिका-याने निश्चित केलेल्या तारखेच्या आत त्याचे समाधान होईल अशारीतीने पार पाडण्यात कसूर केली किंवा ते पार पाडण्यास आपण असमर्थ असल्याचे कोणत्याही वेळी, कार्यकारी अधिका-यास लेखी कळविले तर कार्यकारी अधिकारी स्वतः ते काम पार पाडवून घेईल आणि त्या प्रयोजनार्थ कार्यकारी अधिका-याला आलेला खर्च त्या मालकाकडून वसूल करण्यात येईल.

(६) परियोजनेत अंतर्भूत असलेल्या कोणत्याही जमिनीचा मालक [१][शासन] असेल तर ज्या शासकीय विभागाकडे अशा जमिनीचे नियंत्रण व व्यवस्थापन असेल तो शासकीय विभाग किंवा यथास्थिति, मंडळाने अथवा [२][राज्य] शासनाने [३][किंवा कंपनीने] निर्देशित केलेला कार्यकारी अधिकारी हा, परियोजनेखालील जी कामे पार पाडण्यास [१][शासन] उत्तरदायी असेल ती कामे पार पाडील.]

ज्यांच्या जमिनी परियोजनेत समाविष्ट नाहीत अशा व्यक्तींचे अंशदान देण्याचे दायित्व.

**१२.** (१) परियोजनेखाली एखादे काम [४][* * *] पार पाडण्यात आले व [५][जेथे काम करण्यात आले असेल त्या जमिनीच्या मालकाहून अन्य अशा [१][शासन] धरुन कोणत्याही व्यक्तीला] काम मिळण्याचा संभव असेल तर ती व्यक्ती [६][[७][राज्य] शासन] [८][किंवा कंपनी] अंशदान म्हणून निर्धारित करील ती रक्कम जर ते काम मालकाने केले असेल तर त्याला किंवा कार्यकारी अधिका-याने केले असेल तर [२][राज्य] शासनाला [३][किंवा कंपनीला] देईल.

परंतु [२][राज्य] शासनास, त्याने [९][ [१०][शासनाच्या] मालकीच्या जमिनीत] केलेल्या कामाच्या बाबतीत अशा अंशदानांची संपूर्ण किंवा अंशतः रक्कम माफ करता येईल. [११][जेथे कंपनीच्या खर्चाने काम पार पाडण्यात येईल आणि राज्य शासन अंशदानाची रक्कम माफ करील त्याबाबतीत, माफ केलेल्या अंशदानाच्या रकमे इतकी रक्कम राज्य शासन कंपनीस देईल].

[१२][(२) ही रक्कम [२][राज्य शासन] [३][किंवा कंपनी] विनिर्दिष्ट करील अशा अवधीत भरण्यात येईल].

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " बादशहा " या ऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] वरील आदेशाअन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ८ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ११ (एक) आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ कलम २ अन्वये " कोणत्याही जमिनीच्या मालकाद्वारे " हे शब्द वगळण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ११ (दोन) अन्वये " बादशहासहित कोणतीही इतर व्यक्ती " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७३, कलम ७ (अ) अन्वये " मंडळ निर्धारित करील असे अंशदान जमिनीच्या मालकाला " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[७] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[८] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ९ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[९] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ११ (चार) आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, कलम २ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१०] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " बादशहा " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[११] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ९ (१) (ब) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[१२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७३, कलम ७ (ब) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

शास्ती. [१][**१२-अ.** जी कोणतीही व्यक्ती, कलम १० खाली अंमलात आलेल्या परियोजनेच्या कोणत्याही तरतुदींचे किंवा कलम १०अ खाली करण्यात आलेल्या कोणत्याही विनियमांचे उल्लंघन करील किंवा उल्लंघन करण्यास कारणीभूत होईल किंवा परियोजनेखाली करण्यात येणा-या कोणत्याही कामाचे नुकसान होण्यास कारणीभूत होईल असे कृत्य करील किंवा कलम १३ [२][अथवा १३ अ] किंवा कलम २५, [३][अथवा २५ अ चे] पोट-कलम [४][ (४) ] खाली तिच्यावर लादण्यात आलेले कोणतेही दायित्व पार पाडण्यात कसूर करील ती व्यक्ती अपराधसिद्धिनंतर ५० रुपयांपर्यंत वाढवता येईल एवढ्या द्रव्य दंडाच्या किंवा एक महिन्यापर्यंत वाढवता येईल अशा साध्या कैदेच्या किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.]

## प्रकरण चार

## **परियोजनेखाली पार पाडण्यात आलेली कामे सुस्थितीत ठेवणे, त्यांची दुरुस्ती करणे व त्यांचा उपयोग करणे.**

विवरणपत्र. [५][**१३.** (१) [६][मुंबई जमीन सुधारणा परियोजना (व्याप्ति वाढविणे आणि सुधारणा) अधिनियम, १९५८ याच्या प्रारंभापूर्वी एखाद्या परियोजनेखाली कोणतेही काम संपूर्णतः पार पाडण्यात आले असेल तर त्या बाबतीत कार्यकारी अधिकारी,] अशा कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्राकरिता पुढील तपशील दिलेले एक विवरणपत्र तयार करील :— १९५८ चा मुंबई ३०.

(अ) (एक) केलेले काम ;

(दोन) त्याचा परिव्यय ;

(तीन) मालकाकडून वसूल करावयाची एकूण रक्कम व त्यासह [७][व्याजाचा दर आणि अशा दराने वसूल करावयाची एकूण रक्कम आणि त्यास आनुषंगिक असलेली कोणतीही बाब] ;

(चार) अशी रक्कम मालकाकडून दर एकरी किंवा दरसाल निर्धारणाच्या दर रुपयामागे ज्या दराने वसूल करावयाची तो सर्वसाधारण दर ;

(पाच) ज्या कालावधीत अशी रक्कम वसूल करावयाची तो कालावधी ;

[८][ (सहा) त्याच्या मते जे काम व्यक्तिशः किंवा संयुक्तपणे सुस्थितीत ठेवण्यात आणि दुरूस्त करण्यात येईल ते काम आणि अशा व्यक्तींचे नाव किंवा व्यक्तींची नावे];

---

[१] सन १९४४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३, कलम ३ आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, कलम २ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३०, कलम ७ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१, कलम २ अन्वये " किंवा कलम २५ अ " हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम १२ आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, कलम २ अन्वये " (५) " या आकड्याऐवजी " (४) " हा आकडा दाखल करण्यात आला.

[५] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम १३ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[६] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३०, कलम ८ (१) अन्वये " अंमलबजावणी अधिकारी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम १० अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[८] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७३, कलम ८ अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

(ब) जर कोणत्याही भूमापन क्रमांकाच्या किंवा त्याच्या पोट-विभागाच्या बाबतीत, त्यात केलेली कामे सुस्थितीत राखण्यास किंवा दुरुस्ती करण्यास मालक उत्तरदायी नसेल किंवा परिव्यय जर सर्वसाधारण दराहून अन्य दराने मालकाकडून वसूल करावयाचा असेल तर तो परिव्यय, अशा भूमापन क्रमांकांची यादी किंवा पोट-विभागांची यादी आणि अशा भूमापन क्रमांकाच्या किंवा उपविभागाच्या मालकाकडून ज्या दराने परिव्यय, वसूल करावयाचा तो दर;

(क) गावामध्ये पार पाडण्यात आलेले काम दर्शविणारा नकाशा;

(ड) विहित करण्यात येतील अशा इतर बाबी.

(२) या कलमाखाली जेव्हा विवरणपत्र तयार करण्यात येईल तेव्हा त्यात दर्शविलेले कोणतेही हक्क व दायित्वे यांची [१][राज्य] शासन विहित करील अशारीतीने हक्कदारपत्रात [२][किंवा जेथे हक्कदारपत्र नसेल त्याबाबतीत विहित केलेल्या ग्राम अभिलेखात आणि ग्राम लेख्यांत नोंद करण्यात येईल आणि त्यानंतर ती अशा रीतीने हक्कदारपत्रांचा] [३][किंवा यथास्थिति, अशा ग्राम अभिलेखाचा आणि ग्राम लेख्यांचा] भाग बनतील.

कार्यकारी अधिका-याने वसुली विवरण तयार करणे आणि हक्कदारपत्र इत्यादीत नोंदी करणे.

[४][**१३-अ.** (१) कलम १३ मध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, कार्यकारी अधिकारी परियोजनेखाली पार पाडावयाच्या कोणत्याही कामाचा एखादा भाग पूर्ण झाल्यावर एक अंतरिम विवरण तयार करून त्यात पुढील बाबी विनिर्दिष्ट करील—

(एक) कामाचा पूर्ण केलेला भाग;

(दोन) कार्यकारी अधिका-याने ठेवलेल्या काम नोंदवहीत नोंदलेल्या कामाच्या परिव्ययाच्या आधारे परिगणना करून काढलेल्या अशा भागाचा परिव्यय;

(तीन) याप्रमाणे पार पाडलेल्या कामाच्या बाबतीत मालकाकडून वसूल करावयाची अंतरिम रक्कम [५][व्याजाचा दर आणि अशा दराने वसूल करावयाची रक्कम आणि त्यास आनुषंगिक असलेली कोणतीही बाब यासह ;]

(चार) अशी रक्कम ज्या कालावधीत वसूल करावयाची तो कालावधी;

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३० कलम ८ (२) अन्वये " मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९ च्या प्रकरण दहा-अ खाली ठेवण्यात आलेल्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ८ (२) अन्वये " आणि ग्राम लेख्यांचा " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या क्रमांक ३०, कलम ९ अन्वये कलम १३-अ समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ११ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

(पाच) अशी रक्कम मालकाकडून ज्या दराने वसूल करावयाची तो वार्षिक दर एकरी किंवा आकारणीच्या प्रत्येक रुपयामागील सर्वसाधारण दर ;

(सहा) कोणत्याही भूमापन क्रमांकाच्या बाबतीत किंवा अशा भूमापन क्रमांकाच्या उपविभागांच्या बाबतीत, खंड (तीन) खाली वसूल करावयाची रक्कम सर्वसाधारण दराहून अन्य दराने वसूल करावयाची असेल तर, तो दर ;

(सात) अशी रक्कम ज्यांच्याकडून वसूल करावयाची त्या व्यक्तींची नावे ;

(आठ) विहित करण्यात येईल असा इतर तपशील.

(२) अशा परियोजनेखाली संपूर्ण काम पार पाडल्यानंतर कार्यकारी अधिकारी पुढील गोष्टी तयार करील :—

(अ) पुढील गोष्टी विनिर्दिष्ट करणारे अंतिम विवरणपत्र—

(एक) पार पाडलेले काम ;

(दोन) संपूर्ण कामाचा एकूण परिव्यय ;

(तीन) एकूण परिव्ययातून अंतरिम विवरणपत्रांमध्ये विनिर्दिष्ट केलेली अंतरिम रक्कम वजा केल्यानंतर राहिलेली शिल्लक [1][व्याजाचा दर आणि अशा दराने वसूल करावयाची रक्कम आणि त्यास आनुषंगिक असलेली कोणतीही बाब यासह ;]

(चार) अशा शिल्लक रक्कमेच्या संबंधात, परिव्यय किंवा आंशिक परिव्यय म्हणून मालकाकडून वसूल करावयाची शिल्लक रक्कम ;

(पाच) ज्या कालावधीत अशी रक्कम वसूल करावयाची तो कालावधी ;

(सहा) अशी रक्कम ज्यांच्याकडून वसूल करावयाची त्या व्यक्तींची नावे ;

(सात) खंड (चार) खाली विनिर्दिष्ट केलेली रक्कम ज्या दराने वसूल केली पाहिजे तो वार्षिक दर एकरी किंवा निर्धारणाच्या प्रत्येक रुपयामागील सर्वसाधारण दर ;

(आठ) ज्या कोणत्याही भूमापन क्रमांकाच्या बाबतीत किंवा भूमापन क्रमांकाच्या उप-विभागाच्या बाबतीत त्याच्या मालकाकडून वसूल करावयाची रक्कम सर्वसाधारण दराहून अन्य दराने वसूल करावयाची असेल तर, असा दर आणि अशा सर्व भूमापन क्रमांकाची किंवा उप-विभागांची यादी ;

(नऊ) जे काम त्याच्या मते व्यक्ती, व्यक्तिशः किंवा संयुक्तपणे सुस्थितीत राखील किंवा दुरुस्त करील असे काम व अशा व्यक्तींची नावे ;

(दहा) विहित करण्यात येईल असा इतर तपशील ;

(ब) गावामध्ये पार पाडण्यात आलेले काम दर्शविणारा नकाशा.

(३) अंतरिम विवरणपत्रात आणि अंतिम विवरणपत्रात दर्शवलेले हक्क व दायित्वे यांची हक्कदार पत्रात नोंद करण्यात येईल किंवा हक्कदारपत्र नसेल त्याबाबतीत विहित केलेल्या ग्राम अभिलेखात किंवा ग्राम लेख्यात राज्य शासन विहित करील त्या रीतीने नोंदणी करण्यात येईल आणि त्यानंतर ते हक्क व दायित्वे ही यथास्थिति, अशा हक्कदारपत्राचा किंवा अशा ग्राम अभिलेखाचा आणि ग्रामलेख्याचा भाग म्हणून असतील.]

---

[1] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ११ अन्वये हा भागांश जादा दाखल करण्यात आला.

[१][**१४.** (१) कलम १३ [२][किंवा १३-क] खाली तयार केलेल्या विवरणपत्रात काम सुस्थितीत ठेवण्यास व दुरुस्त करण्यास उत्तरदायी म्हणून दर्शवलेली प्रत्येक व्यक्ती [३][विभागीय मृद संधारण अधिकारी] [४][किंवा कंपनी अधिकारी] याचे समाधान होईल अशा रीतीने आणि उक्त अधिकारी निश्चित करील अशा अवधीत आपल्या जमिनीतील आणि उक्त विवरणपत्रात जिच्या बाबतीत तो उत्तरदायी म्हणून दर्शविण्यात आला असेल अशा कोणत्याही इतर जमिनीतील केलेले काम सुस्थितीत ठेवील व दुरुस्त करील.]

कामे सुस्थितीत ठेवणे आणि दुरुस्त करणे याबाबत व्यक्तींवरील आबंधन.

(२) जर अशी एखादी व्यक्ती पोट-कलम (१) खाली [३][विभागीय मृद संधारण अधिका-याने] [४][किंवा कंपनी अधिका-याने] निश्चित केलेल्या अवधीत काम सुस्थितीत ठेवण्यात किंवा दुरुस्त करण्यात कसूर करील तर [३][विभागीय मृद संधारण अधिकारी] [४][किंवा कंपनी अधिकारी] स्वतःते काम सुस्थितीत ठेवील किंवा त्याची दुरुस्ती करील आणि तसे करण्याचा परिव्यय त्या व्यक्तीकडून वसूल करण्यात येईल.]

[५][ (३) जर [३][विभागीय मृद संधारण अधिका-याच्या] [४][किंवा कंपनी अधिका-याच्या] मते आणीबाणीची परिस्थिती उद्‌भवली असेल आणि सर्वसाधारण हिताच्या दृष्टीने पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या कामाची त्वरित दुरुस्ती करणे आवश्यक असेल तर अशा दुरुस्तीचे काम तो पार पाडील आणि अशा प्रत्येक दुरुस्तीचा परिव्यय ज्याच्या जमिनीवर अशी दुरुस्ती करण्यात आली त्या जमिनीचा मालक देईल.]

(४) [३][विभागीय मृद संधारण अधिकारी] [४][किंवा कंपनी अधिकारी] व्यवहार्य असेल तितक्या लवकर [६][राज्य] शासनाला [४][किंवा कंपनीला] अशा दुरुस्तीबाबत कळवील.

---

[१] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम १४ आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, कलम २ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[२] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३०, कलम १० अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५३, कलम ३, दुसरी अनुसूची याअन्वये " जमीन सुधारणा अधिकारी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम १२ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७३, कलम ९ अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[६] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

# प्रकरण पाच
## संकीर्ण

रकमेचा भरणा व वसुली.

[१][ (**१५.** कलमे ११, १२ [२][किंवा १४] खाली [३][राज्य शासनाला द्यावयाची] कोणतीही रक्कम किंवा तिचा हप्ता, या अधिनियमाखाली तो ज्या तारखेस देणे होत असेल त्या तारखेला भरण्यात आला नाही तर अशी रक्कम किंवा अशी हप्त्याची रक्कम ही, ज्या जमिनीच्या लाभासाठी अशी परियोजना मंजूर करण्यात आली किंवा असे काम पार पाडण्यात आले असेल किंवा दुरुस्ती करण्यात आली असेल त्या जमिनीच्या संबंधात येणे असलेली जमीन महसुलाची थकबाकी म्हणून [४][ [५] [संहितेत तरतूद करण्यात आलेल्या] पद्धतींपैकी कोणत्याही पद्धतीने वसूल करता येईल.]

कंपनीला देय असलेली रक्कम ही कसूरदाराच्या जमिनीवरील पहिला भार असणे.

[६][ **१५-अ.** कलमे ११, १२ किंवा १४ खाली जमिनीच्या संबंधात मालकाकडून कंपनीला देय असलेली रक्कम किंवा तिचा हप्ता [त्याबाबत राज्य शासनास देय असलेल्या जमीन महसुलाच्या (कोणताही असल्यास) पूर्वप्रदानाच्या अधीनतेने] त्या जमिनीवरील पहिला भार असेल आणि त्या जमिनीच्या संबंधात निर्माण झालेला इतर कोणताही भार हा त्यानंतरचा असेल आणि कलम १५-ब च्या तरतुदीं अनुसार त्याची वसुली करता येईल.

कंपनीस येणे असलेल्या रकमेची जमीन महसुलाच्या थकबाकी प्रमाणे वसुली.

**१५-ब.** या अधिनियमान्वये किंवा त्याखाली कंपनीला देय असलेली कोणतीही रक्कम किंवा तिचा कोणताही हप्ता तो जेव्हा देय असेल तेव्हा तो भरण्यात आला नाही.—

(अ) आणि या हक्क मागणीबाबत काही विवाद नसेल किंवा विवाद्य रक्कम रुपये १०० पेक्षा जास्त नसेल तर कंपनी अधिकारी, यथास्थिति कंपनीला देय असलेली किंवा कंपनीने हक्कमागणी केलेली रक्कम दर्शविणारे एक प्रमाणपत्र आपल्या सहीनिशी जिल्हाधिका-याकडे पाठवू शकेल आणि लागोलाग जिल्हाधिकारी ही येणे रक्कम किंवा हक्कमागणी करण्यात आलेली रक्कम जमीन महसुलाच्या थकबाकी प्रमाणे वसूल करील.

(ब) आणि हक्कमागणी विवाद्य असेल व विवादातील रक्कम रु. १०० पेक्षा अधिक असेल तर तो विवाद त्या प्रयोजनासाठी राज्य शासनाने रचना केलेल्या न्यायाधिकरणाकडे निर्णयार्थ पाठवण्यात येईल ; आणि न्यायाधिकरण त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर आणि ज्या व्यक्तीकडून रक्कम येणे असल्याचे अभिकथित करण्यात आले असेल तिला आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर त्या प्रश्नाचा निर्णय करील ; आणि न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असेल व लागोलाग जिल्हाधिकारी, येणे म्हणून निर्धारित करण्यात आलेली रक्कम, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करील.]

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७३, कलम १० अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[२] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ कलम २ अन्वये "१४ किंवा २५-अ" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम १३ अन्वये " खाली द्यावयाची " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३०, कलम ११ अन्वये " मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९ च्या कलम १५० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ च्या कलम ४ अन्वये संबंधित " जमीन महसूल अधिनियमात " या ऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[६] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम १४ अन्वये कलम १५-अ आणि १५-ब समाविष्ट करण्यात आले.

[१][(**१५ क.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही परियोजनेखाली कोणतेही काम कोणत्याही अनुसूचित बँकेकडून कंपनीने घेतलेल्या कर्जाच्या सहाय्याने कंपनीने पार पाडायचे असेल किंवा तिने ते पूर्ण केले असेल आणि परिणामी कलम १५-अ खाली, कंपनीच्या प्रीत्यर्थ कोणत्याही जमिनीवर भार निर्माण झाला असेल त्याबाबतीत, कलम १५-अ खालील त्याबद्दलच्या प्राथम्यक्रमानुसार उक्त कामाच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या परिव्ययाच्या (व्याज धरुन) वसुलीसंबंधाने कंपनीचे सर्व हक्क व दायित्वे ही.—

अनुसूचित बँकेने कर्ज दिले असेल त्याबाबतीत, लाभग्राही जमीन मालकांकडून येणे रकमांची त्वरेने वसुली होण्यासाठी कंपनीचे हक्क बँकेकडे हस्तांतरित करणे.

(अ) कंपनीने कलम १३ अ खालील अंतरिम किंवा अंतिम विवरणपत्र तयार करुन ते ज्या कंपनीने ज्या अनुसूचित बँकेकडून निधी घेतला असेल त्या बँकेस ते अधिसूचित करण्यात आल्यावर ; आणि

(ब) विवरणपत्रामध्ये नामोल्लेख केलेल्या सर्व किंवा कोणत्याही मालकांना ते कंपनीचे ऋणको म्हणून असण्याऐवजी त्या बँकेचे ऋणको म्हणून असल्याचे मान्य केल्याचे अशा अनुसूचित बँकेने कंपनीला अधिसूचित केल्यावर ;

अनुसूचित बँकेकडे हस्तांतरित आणि तिच्याकडे निहित होतील :

परंतु, अनुसूचित बँकेने विवरणपत्रात नामोल्लेख केलेल्या सर्व मालकांना मान्यता न देता त्यापैकी काही जणांनाच मान्यता दिली असेल त्याबाबतीत, अनुसूचित बँकेने आपले ऋणको म्हणून मान्यता दिलेल्याच मालकांच्या जमिनीसंबंधातील कंपनीचे हक्क व दायित्वे ही, त्याबद्दलच्या प्राथम्यक्रमानुसार अनुसूचित बँकेकडे हस्तांतरित आणि तिच्याकडे निहित होतील.

(२) असे हस्तांतरण झाल्यावर, कंपनी संबंधित मालकांना त्यासंबंधी कळवील आणि त्यानंतर अनुसूचित बँकेने आपला ऋणको म्हणून मान्यता दिलेल्या प्रत्येक मालकाकडून वसुलीयोग्य म्हणून अंतरिम किंवा यथास्थिति, अंतिम विवरणपत्रात दाखविलेली रक्कम ही, अशा विवरणपत्रात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा हप्त्यांत आणि अशा दराच्या व्याजासहित, संबंधित मालक नियत तारखेस अनुसूचित बँकेस देईल.

(३) कोणत्याही मालकांच्या संबंधातील कंपनीचे हक्क व दायित्वे ही एखाद्या अनुसूचित बँकेकडे हस्तांतरित होऊन ती तिच्याकडे निहित झाली असतील त्याबाबतीत, बँक, तलाठ्यास किंवा राज्य शासन याबाबत पदनिर्देशित करील अशा अधिका-यास, जमिनीचा तपशील व अशा मालकांची नावे आणि जमिनीवर तिच्या प्रीत्यर्थ निर्माण करण्यात आलेला भार किंवा गहाण यासंबंधी कळवील. तलाठी किंवा पदनिर्देशित अधिकारी हक्कदारपत्रात किंवा हक्कदारपत्र नसेल त्याबाबतीत, विहित ग्राम अभिलेखात आणि ग्राम लेख्यांत जमिनीचा गहाणदार म्हणून, बँकेचे नाव दर्शवील आणि निर्माण करण्यात आलेल्या भाराच्या किंवा दिलेल्या गहाणाच्या इतर तपशीलाची नोंद घेईल. त्याचप्रमाणे बँक कोणत्याही मालकाकडून येणे असलेली रक्कम येणे असल्याचे बंद झाल्यानंतर लगेच तलाठ्यास किंवा पदनिर्देशित अधिका-यास कळवील आणि त्यानंतर तलाठी किंवा पदनिर्देशित अधिकारी, यथास्थिति ती जमीन भारामधून किंवा गहाणामधून मुक्त झाल्याची योग्य ती नोंद हक्कदारपत्रात किंवा ग्राम अभिलेखात किंवा ग्राम लेख्यांत करील.

(४) कलमे १५ अ आणि १५ ब च्या तरतुदी या, योग्य त्या फेरफारांसह, या कलमाखाली जमिनीच्या कोणत्याही मालकाने कोणत्याही अनुसूचित बँकेस द्यावयाच्या कोणत्याही रकमेस किंवा हप्त्यास जणू काही त्या कलमातील कंपनी आणि कंपनी अधिकारी याबाबतचे निर्देश हे अनुक्रमे अनुसूचित बँक आणि बँक अधिकारी याबाबतचे निर्देश असावेत त्याप्रमाणे लागू होतील.]

---

[१] सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३ अन्वये कलम १५-क समाविष्ट करण्यात आले.

प्रवेश करण्याचा हक्क.

**१६.** कोणतीही परियोजना तयार करण्याच्या, मंजूर करण्याच्या किंवा तिची अंमलबजावणी करण्याच्या [१][किंवा कोणत्याही परियोजनेखाली कोणतीही कामे दुरुस्त करण्याच्या किंवा सुस्थितीत ठेवण्याच्या] प्रयोजनासाठी [२][मंडळाने, जिल्हाधिका-याने किंवा [३][विभागीय मृद संधारण अधिका-याने]] [४][किंवा कंपनीने] प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीला, तिने विहित करण्यात येईल अशी नोटीस मालकाला, भोगवटादाराला किंवा कोणत्याही जमिनीत हितसंबंध असलेल्या इतर व्यक्तीला दिल्यानंतर अशा जमिनीवर प्रवेश करता येईल, सर्वेक्षण करता येईल आणि आखणी करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक त्या कृती करता येतील.

संक्षिप्तरीत्या चौकशी करणे.

**१७.** (१) या अधिनियमाखाली चौकशी करण्याचा अधिकार प्रदान केलेला मंडळाहून अन्य कोणताही प्राधिकारी [५][संहितेअन्वये] संक्षिप्त चौकशी करण्याबाबत ज्या रीतीची तरतूद केलेली असेल त्याच रीतीने चौकशी करील आणि संक्षिप्त चौकशी करण्यासंबंधी [६][संहितेत] असलेल्या सर्व तरतुदी शक्य तेथवर अशा चौकशीस लागू असतील.

(२) समन्स काढून कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यास भाग पाडण्याचे, आणि शपथेवर त्याची तपासणी करण्याचे आणि दस्तऐवज सादर करण्याची सक्ती करण्याचे जे अधिकार [७][संहितेअन्वये] महसूल अधिका-याकडे निहित असतील तेच अधिकार अशा प्राधिका-यास व तसेच मंडळास असतील.

करण्यात आलेल्या सुधारणांमुळे खंड वाढविण्याची मालकास परवानगी.

**१८.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, परियोजनेत अंतर्भूत असलेल्या कोणत्याही जमिनीच्या मालकाने अशा जमिनीच्या कुळाने द्यावयाचा खंड विहित करण्यात येईल इतक्या रकमेने व विहित करण्यात येईल अशा शर्तींच्या अधीनतेने वाढवणे वैध असेल.

जमीन सुधारणा परियोजनेसंबंधीचा दस्तऐवज, आराखडा किंवा नकाशा याची नोंदणी करण्याची आवश्यकता नाही.

**१९.** (१) भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ यातील कोणत्याही गोष्टीमुळे, अंमलात आलेल्या परियोजनेच्या संबंधात तयार केलेल्या किंवा मंजूर केलेल्या कोणत्याही दस्तऐवजाची, आराखड्याची किंवा नकाशाची नोंदणी करण्याची आवश्यकता आहे असे मानले जाणार नाही. १९०८ चा १६.

---

[१] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम १५ (एक) आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, कलम २ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १५ (दोन) अन्वये " मंडळाने किंवा जिल्हाधिका-याने " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५३, कलम ३, दुसरी अनुसूची अन्वये " जमीन सुधारणा अधिकारी " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम १५ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ च्या कलम ५ (अ) (एक) अन्वये " संबंधित जमीन महसूल अधिनियमान्वये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ५ (अ) (दोन) अन्वये " अशा अधिनियमात " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब) अन्वये " संबंधित जमीन महसूल अधिनियमान्वये " या ऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

१९०८ चा १६. (२) असे सर्व दस्तऐवज, आराखडे आणि नकाशे, भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ कलमे ४८ व ४९ यांच्या प्रयोजनाकरिता त्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार नोंदण्यात आले आहेत असे मानण्यात येईल :

परंतु, मंजूर परियोजनेसंबंधीचे दस्तऐवज, आराखडे व नकाशे विहित रीतीने लोकांस पहावयास मिळतील.

**२०.** [प्रांतिक सरकारने अधिकारांचे प्रत्यायोजन करणे] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम १६ आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, कलम २ अन्वये निरसित करण्यात आले.

प्रत्यायोजन.

[1][**२१.** [2][राज्य] शासन व [2][राज्य] शासनाच्या नियंत्रणाच्या अधीनतेने जिल्हाधिकारी किंवा [3][विभागीय मृद संधारण अधिकारी], या अधिनियमानुसार किंवा त्याखाली त्याला प्रदान करण्यात आलेले अधिकार किंवा त्याने पार पाडावयाचे कोणतेही कार्य कोणत्याही अधिका-याकडे [4][किंवा व्यक्तीकडे] प्रत्यायोजित करू शकेल.]

विवक्षित अधिकारी लोकसेवक असणे.

**२२.** मंडळाचे सदस्य आणि सचिव, चौकशी अधिकारी आणि मंडळाने [5][किंवा कंपनीने] जिल्हाधिका-याने [3][विभागीय मृद संधारण अधिका-याने] किंवा [2][राज्य] शासनाने यथास्थिति, कलम ४ चे पोट-कलम (२), कलम ११ चे पोट-कलम (१), [6] * * * * कलम १६, [7][कलम २१] किंवा कलम २५ चे पोट-कलम (२) याखाली प्राधिकृत केलेला किंवा नेमलेला कोणताही अधिकारी किंवा व्यक्ती ही, भारतीय दंडसंहितेच्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

१८६० चा ४५.

सद्भावपूर्वक काम करणा-या व्यक्तींना संरक्षण आणि दावा व खटल्याची मुदत.

**२३.** (१) कोणताही लोकसेवक किंवा या अधिनियमाखाली योग्य प्राधिकार देण्यात आलेल्या व्यक्तीविरुद्ध, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमान्वये त्याने सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचा त्याचा उद्देश असलेल्या कार्यवाहीबाबत कोणताही दावा, खटला किंवा इतर वैध कार्यवाही करता येणार नाही.

---

[1] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७३, कलम ११ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[2] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[3] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५३, कलम ३, दुसरी अनुसूची अन्वये " जमीन सुधारणा अधिकारी " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[4] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम २८६, दहावी अनुसूची अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[5] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम १६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[6] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५३, कलम २, पहिली अनुसूची या अन्वये " कलम १२ चे पोट-कलम (२) " हा मजकूर वगळण्यात आला.

[7] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७३, कलम १८ अन्वये " कलम २१ " हा शब्द व आकडे समाविष्ट करण्यात आले.

(२) या अधिनियमाखाली रीतसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही लोकसेवकाने किंवा व्यक्तीने या अधिनियमाखाली केलेल्या किंवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही कृतीच्या संबंधात कोणताही दावा किंवा खटला, ज्याबाबत तक्रार करण्यात आलेली असेल अशी कृती घडल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत दाखल करण्यात आलेला नसेल तर, दाखल करता येणार नाही.

नियम तयार करण्याचा अधिकार.

**२४.** (१) [१][राज्य] शासनास, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ **शासकीय राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध करून तीअन्वये नियम करता येतील.

(२) विशेषकरून व पूर्वोक्त अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता पुढील गोष्टींबाबत निर्णय घेण्यासाठी नियम करता येतील :—

[२][ (एक) कलम ४ च्या पोटकलम (१) च्या खंड (नऊ) आणि पोटकलम (२) च्या खंड (पाच) मध्ये विहित करावयाच्या बाबी ;

(दोन) कलम १३, पोटकलम (१) च्या खंड (ड) खाली विहित करावयाच्या बाबी ;]

[३][ (तीन) कलम १३अ, पोटकलम (१) आणि (२) खाली विहित करावयाचा इतर तपशील ;

(तीन-अ) कलमे १३ आणि १३अ खाली तयार करण्यात आलेल्या विवरणपत्रात दर्शविण्यात आलेले हक्क व दायित्वे हक्कदारपत्रात किंवा ग्राम अभिलेखात आणि ग्राम लेख्यांत नोंदवण्याची पद्धत,]

(चार) कलम १६ खाली नोटीस देण्याची रीत ;

(पाच) कलम १९ खाली दस्तऐवज, आराखडे आणि नकाशे ज्या रीतीने लोकांना पहाण्यासाठी ठेवण्यात येतील ती रीत ;

[४]* * * * *

(३) या कलमाखाली तयार करण्यात येणारे नियम पूर्वप्रसिद्धीच्या अटीला अधीन असतील.

[५][ (४) या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या एका अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास किंवा तो करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील, आणि **शासकीय राजपत्रात** असा निर्णय अधिसूचित केला असेल तर तो नियम अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून यथास्थिति फेरबदल केलेल्या स्वरुपात अंमलात येईल किंवा अंमलात येणार नाही. तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे, त्या नियमाखाली त्यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वगळलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.]

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम १९ आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २९, कलम २ अन्वये मूळ खंड (एक) ते (आठ) ऐवजी खंड (एक) ते (सहा) दाखल करण्यात आले.

[३] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३०, कलम १३ अन्वये खंड (तीन) ऐवजी खंड (तीन) आणि (तीन-अ) दाखल करण्यात आले.

[४] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ३, अन्वये खंड (सहा) वगळण्यात आला.

[५] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम २ अन्वये पोटकलम (४) समाविष्ट करण्यात आले.

[१][**२५.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाला पुढील प्रकरणांमध्ये, कोणत्याही क्षेत्रात कलम ४ च्या पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही बाबींच्या संबंधात तरतूद करण्यासाठी निदेश देता येईल :–

विवक्षित परिस्थितीमध्ये परियोजना तयार करण्याबद्दल निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

(एक) राज्य शासन [२][कंपनी] किंवा कोणताही विश्वस्त निधी परियोजनेच्या परिव्ययाच्या २५ टक्क्यांपेक्षा जास्त नसेल इतके अंशदान करीत असेल तर ;

(दोन) एखादी व्यक्ती किंवा प्राधिकारी परियोजनेच्या अंदाजित परिव्ययाच्या २५ टक्क्यांपेक्षा जास्त नसेल इतके अंशदान करणार असेल तर,

[३]* * * * *

(चार) राज्य शासनाच्या मते, संघाच्या सशस्त्र दलातील सदस्य असतील अशा कोणत्याही व्यक्ती किंवा ज्या अशाप्रकारच्या सदस्य होत्या व निवृत्त झाल्या आहेत अशा किंवा अशा व्यक्तींवर अवलंबून असतील अशा कोणत्याही व्यक्ती यांच्या हितासाठी जमीन सुधारणा करणे आवश्यक असेल तर, किंवा

(पाच) जर राज्य शासनाच्या मते, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने परियोजना आवश्यक असेल तर.

(२) कलम ४ च्या पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेला तपशील असलेली प्रारुप परियोजना तयार करण्यासाठी असा निदेश देण्यात येईल त्यावेळी किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी मंडळ देईल त्या अनुदेशांस अनुसरून अधिकारी नेमण्याचा प्राधिकार राज्य शासन मंडळास देईल. असा नेमलेला अधिकारी त्याप्रमाणे परियोजनेचा मसुदा तयार करील आणि तो मंडळास मंजुरीसाठी सादर करील.

(३) पोटकलम (२) खाली परियोजना मंजुरीसाठी मंडळास सादर करण्यात आल्यावर, कलम ५ आणि उक्त कलमांच्या नंतरची कलमे आणि कलम २४ खाली केलेले नियम, ते लागू करता येतील तेथवर अशा परियोजनेच्या संबंधात लागू होतील.

(४) पोटकलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमाखालील परियोजनेच्या प्रयोजनासाठी ज्या जमिनीत कोणतेही काम करण्यात आले असेल त्या जमिनीचा मालक, कलम १३ [४][किंवा १३अ] खालील विवरणपत्र तयार करण्यात येईपर्यंत, विभागीय मृद संधारण अधिका-याचे [५][किंवा कंपनी अधिका-याचे] समाधान होईल अशा प्रकारे ते काम सुस्थितीत ठेवण्यास तर तो निश्चित करील अशा अवधीत त्याची दुरुस्ती करण्यास उत्तरदायी असेल.

कलम १४, पोटकलम (२) च्या तरतुदी या, मालकाच्या या कलमाखालील उत्तरदायित्वाच्या संबंधात लागू असतील.]

---

[१] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ४ अन्वये मूळ कलम २५ आणि २५अ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[२] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम १८ (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१, कलम ३ अन्वये खंड (तीन) वगळण्यात आला.

[४] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३०, कलम १४, अन्वये " किंवा १३अ " हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम १७ (२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

टंचाईग्रस्त क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आलेल्या क्षेत्रामध्ये परियोजना तयार करण्याचा आणि तिची अंमलबजावणी करण्याचा निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

[१][**२५अ.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाच्या [२][मते टंचाईची परिस्थिती चालू असेल] किंवा एखाद्या क्षेत्रात ती परिस्थिती उद्‌भवण्याची शक्यता असेल [३][किंवा कोणत्याही क्षेत्रात ग्रामीण बेकारी नाहिशी करण्यासाठी योग्य कामाची तरतूद करणे आवश्यक असेल] [४][किंवा सार्वजनिक हिताच्या दृष्टीने कोणत्याही क्षेत्रात कोणतीही आणीबाणीची परिस्थिती टाळण्यासाठी जमीन सुधारणेचे काम त्वरित हाती घेणे आवश्यक असेल] तर शासनास त्याप्रमाणे घोषणा काढता येईल. अशी घोषणा **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येईल. अशी घोषणा प्रसिद्ध करण्यात आल्यावर राज्य शासन जिल्हाधिकारी [५][किंवा कंपनी] यांना [६][विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा गावांत किंवा क्षेत्रात बंधारे, पाट बांधण्यासाठी किंवा जमीन सुधारणेचे कोणतेही बांधकाम तात्काळ करण्यासाठी] कार्यकारी अधिकारी म्हणून एका अधिका-याची नेमणूक करण्याचा निदेश देऊ शकेल. अशा निदेशानुसार, कलम ४ च्या पोटकलम (१) च्या खंड (एक) आणि (दोन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींसंबंधात किंवा त्या कलमाच्या पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बाबींसंबंधात त्या गावातील [७][किंवा क्षेत्रातील] मंडळाला त्याबाबत तरतूद करणारी परियोजना तयार करणे आवश्यक असेल.

(२) पोटकलम (१) खाली निदेश देण्यात आल्यावर, मंडळ [८][या प्रयोजनासाठी नेमणूक केलेल्या अधिका-याला] प्रारूप परियोजना तयार करण्याची सूचना करील आणि त्यात पोटकलम (१) खाली [९][कार्यकारी अधिका-याने हाती घेतलेल्या] सर्व कामांचा आणि मंडळ देईल अशा अनुदेशांनुसार कलम ४ च्या पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या इतर कामांचा समावेश असेल. त्यानुसार संबंधित [१०][अधिकारी] प्रारूप परियोजना तयार करील आणि तो मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करील.

---

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१, कलम ४ अन्वये कलमे २५अ आणि २५ब समाविष्ट करण्यात आली.

[२] शासकीय अधिसूचना, कृषि व वन विभाग क्रमांक एससीएस-१५६४-तीन-८०६२ एफ, दिनांक २८ ऑक्टोबर १९६४ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३०, कलम १५ (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४, कलम २ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम १८ (१) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[६] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४, कलम २ अन्वये " विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रामध्ये बंधा-याचे बांधकाम " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या क्रमांक ४४, कलम २ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[८] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम १८ (२) (अ) अन्वये " कार्यकारी अधिका-याला " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] वरील अधिनियमाच्या कलम १८ (२) (ब) अन्वये " त्याने हाती घेतलेल्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१०] वरील अधिनियमाच्या कलम १८ (२) (क) अन्वये " कार्यकारी अधिकारी " या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(३) मंडळापुढे सादर करण्यात आलेली प्रारूप परियोजना मंडळाला त्यांत फेरबदल न करता किंवा पोटकलम (१) खाली कार्यकारी अधिका-याने केलेल्या कामावर परिणाम होणार नाही असे फेरबदल करून मान्य करता येईल. मंडळाने याप्रमाणे मान्य केलेली परियोजना **शासकीय राजपत्रात** आणि परियोजनेत समाविष्ट असलेल्या जमिनी जेथे असतील त्या गावात [1][किंवा क्षेत्रात] प्रसिद्ध करण्यात येईल. परियोजना गावात [1][किंवा क्षेत्रात] ज्या तारखेला प्रसिद्ध करण्यात येईल त्या तारखेपासून उक्त परियोजना, जणू काही ती या अधिनियमामध्ये अधिनियमित करण्यात आलेली असावी त्याप्रमाणे अंमलात येईल आणि परिणामक्षम असेल. कलम १०अ आणि उक्त कलमाच्या नंतरची कलमे यांच्या तरतुदी आणि कलम २४ खाली तयार करण्यात आलेले नियम लागू करण्याजोगे असतील तेथवर ही परियोजना जणू काही कलम १० खाली अंमलात आलेली परियोजना असावी त्याप्रमाणे लागू होतील.

(४) पोटकलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, या कलमाखालील परियोजनेच्या प्रयोजनासाठी ज्या जमिनीत हे काम पार पाडण्यात आले असेल त्या जमिनीचा मालक कलम १३ [2][किंवा १३अ] खाली विवरणपत्र तयार होईपर्यंत विभागीय मृद संधारण अधिका-याचे [3][किंवा कंपनी अधिका-याचे] समाधान होईल अशा रीतीने ते काम सुस्थितीत ठेवण्यास आणि तो नियम करील अशा अवधीच्या आत त्याची दुरुस्ती करण्यास उत्तरदायी असेल आणि कलम १४ च्या पोटकलम (२) च्या तरतुदी मालकाच्या या कलमाखालील उत्तरदायित्वाच्या संबंधात लागू होतील.

**२५ब.** मंडळाने अर्ज केलेला असेल आणि तसे करणे आवश्यक असल्याची राज्य शासनाची खात्री पटेल तर राज्य शासनास, कोणत्याही वेळी, [4][आवश्यक असल्यास कंपनीशी विचार विनिमय केल्यानंतर] कोणतीही परियोजना, ती अंमलात आल्यानंतर, प्रत्याहृत करता येईल आणि अशा प्रत्याहरणानंतर कलम १५ सोडून या अधिनियमाच्या तरतुदी अशा परियोजनेला लागू होण्याचे बंद होईल. अशी अधिसूचना त्या, परियोजनेत समाविष्ट असलेल्या जमिनी जेथे असतील त्या गावात आणि [5][तालुक्याच्या [6] ** ] आणि जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणीही प्रसिद्ध करण्यात येईल. परियोजना प्रत्याहृत करण्याचा अधिकार.

---

[1] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४, कलम २ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३०, कलम १५ (१) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम १८ (३) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम १९ (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३०, कलम १६ अन्वये " तालुक्याच्या " या शब्दाऐवजी " तालुक्याच्या तहसिलाच्या " हे शब्द दाखल करण्यात आले.

[6] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम १९ (२) अन्वये " तहसिलांच्या किंवा महालाच्या " हे शब्द वगळण्यात आले.

[1][राज्य] शासनाने केलेल्या खर्चाचा भार [2][राज्याच्या एकत्रित निधीवर] असणे.

**२६.** [1][राज्य]शासनाला, त्याने या अधिनियमाखाली केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या अनुरोधाने कराव्या लागलेल्या खर्चाचा भार [2][राज्याच्या एकत्रित निधीवर] असेल.

शासनाचे हक्क व दायित्वे [5][कृषि व ग्रामीण विकास बँकेकडे] हस्तांतरित केल्याचा परिणाम.

[3]**[२६-अ.** कोणत्याही परियोजनेखाली पार पाडलेल्या कामाचा परिव्यय किंवा आंशिक परिव्यय अशा परियोजनेत अंतर्भूत केलेल्या जमिनीच्या कोणत्याही मालकाकडून वसूल करण्यासंबंधातील, राज्य शासनाचे हक्क व दायित्वे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याच्या कलम १४३-अ खाली एखाद्या [4][कृषि व ग्रामीण विकास बँकेकडे] हस्तांतरित झालेली असतील त्याबाबतीत, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरीही, असा प्रत्येक जमीन मालक त्याच्याकडून या अधिनियमाखाली वसूल करण्याजोगी रक्कम अशा बँकेस देईल, अशा परिव्ययाची किंवा आंशिक परिव्ययाची रक्कम महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याच्या कलम १४३-अ च्या तरतुदींनुसार असा जमीन मालक देईल व त्याच्याकडून वसूल करण्यात येईल आणि बँकेकडे हस्तांतरित झालेल्या हक्कांची व दायित्वांची, यथास्थिति कलम १३, पोट-कलम (२) किंवा कलम १३अ, पोट-कलम (३) मध्ये उल्लेखलेल्या अभिलेखांत नोंद करण्यात येईल.]

१९६१ चा महाराष्ट्र २४.
१९६१ चा महाराष्ट्र २४.

परियोजना कंपनीकडे हस्तांतरित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

[6]**[२६-ब.** (१) या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, राज्य शासनाला, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेअन्वये, कलम १० खाली अंमलात आल्या असतील अशा परियोजना, त्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आल्या असतील अशा आणि ज्या राज्य शासन आणि कंपनी यांनी परस्परात मान्य केल्या असतील अशा अटींवर व शर्तीवर (राज्य शासनाने कोणतीही हमी देण्याबाबतची कोणतीही शर्त धरून) कंपनीकडे हस्तांतरित करता येतील.

(२) परियोजना पोट-कलम (१) खाली कंपनीकडे हस्तांतरित केल्यावर,—

(अ) अशा कोणत्याही परियोजनांखालील कोणतेही काम किंवा त्याचा भाग राज्य शासनाच्या परिव्ययाने किंवा आंशिक परिव्ययाने पार पाडण्यात आले असेल किंवा पार पाडावयाचे असेल आणि कलम १३ खाली तयार केलेल्या विवरणपत्रामध्ये किंवा कलम १३-अ खाली तयार केलेल्या अंतरिम किंवा अंतिम विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या परियोजनांमध्ये समाविष्ट केलेल्या जमिनीच्या (शासकीय जमिनीहून अन्य) मालकांकडून असा परिव्यय वसूल करावयाचा असेल त्याबाबतीत असा परिव्यय किंवा आंशिक परिव्यय जमिनीच्या मालकाकडून वसूल करण्यासंबंधीचे, हा अधिनियम व त्याखाली तयार केलेले नियम व विनियम या खालील राज्य शासनाचे हक्क व दायित्वे अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपासून, अशा जमीनमालकांच्या संबंधात कंपनीकडे हस्तांतरित झालेले असतील ;

---

[1] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[2] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३०, कलम १७ अन्वये " राज्याच्या महसुलावर " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[3] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ३ अन्वये कलम २६-अ समाविष्ट करण्यात आले.

[4] सन १९८९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २७ च्या कलम ६ (अ) अन्वये " भूविकास बँकेकडे " याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमान्वये कलम ६ (ब) अन्वये " भूविकास बँकेकडे " याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम २६-ब अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

(ब) कंपनी, पूर्वोक्ताप्रमाणे हस्तांतरित केलेल्या परियोजनांच्या परिव्ययाइतकी किंवा आंशिक परिव्ययाच्या भागाइतकी रक्कम राज्य शासनास देईल ;

(क) राज्य शासन, संबंधित जमिनीच्या मालकांना हक्क व दायित्वे यांच्या अशा हस्तांतरणासंबंधी कळवील ;

(ड) जमिनीचे मालक पूर्वोक्ताप्रमाणे त्यांच्याकडून यथास्थिति वसूल करावयाची रक्कम किंवा शिल्लक रक्कम कंपनीस देतील ; आणि

(ई) तद्नुसार कंपनीला देण्यात आलेल्या कोणत्याही रकमांमुळे, जमीन मालक, अशा परियोजनांखाली राज्य शासनाला रक्कम देण्याबाबतच्या आपल्या दायित्वापासून मुक्त होतील.

(३) पोट-कलम (२) मध्ये उपबंधित केले असेल ते खेरीज करून एरव्ही, या अधिनियमाच्या सर्व तरतुदी या कलमाखाली, तयार केलेल्या व कंपनीने अंमलबजावणी केलेल्या परियोजनांच्या संबंधात ज्याप्रमाणे लागू होतात त्याप्रमाणे पोट-कलम (२) अन्वये कंपनीकडे हस्तांतरित केलेल्या परियोजनांच्या बाबतीत लागू होतील.]

[1][ **२७.** कलम ३ खाली कोणत्याही विभागासाठी रचना करण्यात आलेली सर्व मंडळे, ज्या दिवशी मुंबई जमीन सुधारणा परियोजना (सुधारणा) अधिनियम, १९४८ अन्वये सुधारणा केलेल्या कलम ३ खाली नवीन मंडळाची रचना करण्यात येईल त्या दिवशी विसर्जित करण्यात येतील : व्यावृत्ती.

१९४८ चा मुंबई ७३.

परंतु, प्रथम उल्लेखिलेल्या मंडळाने दिलेला कोणताही निदेश, केलेल्या नेमणुका, मंजूर केलेली परियोजना, केलेला विनियम आणि केलेल्या सर्व गोष्टी विधितः देण्यात किंवा करण्यात, मंजूर करण्यात आल्या आहेत असे मानले जाईल. आणि याप्रमाणे मंजूर केलेली कोणतीही परियोजना अशी परियोजना ज्या जमिनीच्या संबंधात मंजूर करण्यात आली असेल ती जमीन ज्या जिल्ह्यात असेल त्या जिल्ह्यात पूर्वोक्ताप्रमाणे रचना केलेले नवीन मंडळ पार पाडील :

परंतु आणखी असे की, अशी जमीन एकापेक्षा अधिक जिल्ह्यांच्या हद्दीत असेल तर कोणत्या मंडळाने ती परियोजना पार पाडावयाची ते [2][राज्य] शासन ठरवील.

**२८.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, मुंबई जमीन सुधारणा परियोजना (सुधारणा) अधिनियम, १९४८ ज्या तारखेला अंमलात आला, त्यापूर्वी रचना करण्यात आलेले मंडळ, देण्यात आलेले कोणतेही निदेश, केलेल्या नेमणुका, मान्य केलेल्या परियोजना, केलेले विनियम तसेच मंडळाने केलेल्या किंवा त्याच्या वतीने करण्यात आलेल्या सर्व गोष्टी विधिग्राह्यरीत्या रचना करण्यात आलेले मंडळ, देण्यात आलेले निदेश किंवा केलेल्या नेमणुका किंवा मान्य करण्यात आलेल्या परियोजना किंवा केलेले विनियम व केलेल्या गोष्टी होत्या व नेहमीच तशा होत्या असे मानण्यात येईल आणि उक्त तारखेपूर्वी कृषि आयुक्ताने किंवा कृषि अभियांत्रिकी संचालकाने मंडळाचा सदस्य म्हणून कार्यवाही केली होती एवढ्याच केवळ कारणासाठी ते बेकायदेशीररीत्या रचना करण्यात आलेले, देण्यात आलेले, मान्य करण्यात आलेले, केलेले किंवा केलेल्या होत्या असे मानण्यात येणार नाही. मंडळाची रचना व कार्यवाही विधिग्राह्य ठरवणे.

१९४८ चा मुंबई ७३.

[1] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७३, कलम १३ अन्वये कलमे २७, २८ व २९ जादा दाखल करण्यात आली.

[2] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[1][म “” *]



निरसन व व्यावृत्ती. [1][२८-अ. (१) मुंबई जमीन सुधारणा परियोजना (व्याप्ती वाढविणे आणि सुधारणा) अधिनियम, १९५८ च्या प्रारंभापासून आणि तेव्हापासून हैदराबाद जमीन सुधारणा अधिनियम, १९५३ आणि सौराष्ट्र जमीन सुधारणा परियोजना अधिनियम, १९५४ हे, पोट-कलम (२) ते (५) यांच्या तरतुदींच्या अधीनतेने निरसित होतील. १९५८ चा मुंबई ३०. १९५३ चा हैदराबाद १९. १९५४ चा सौराष्ट्र १९.

(२) याप्रमाणे निरसित केलेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमाखाली एखाद्या जिल्ह्यासाठी स्थापन करण्यात आलेले प्रत्येक मंडळ विसर्जित होईल आणि त्याचे सदस्य अशा जिल्ह्यासाठी या अधिनियमाच्या कलम (३) खाली ज्या दिवशी नवीन मंडळाची रचना करण्यात येईल त्या दिवशी आपले अधिकारपद रिकामे करतील :

परंतु, प्रथम उल्लेख केलेल्या मंडळाने केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (यात, दिलेला कोणताही निदेश, मान्य किंवा प्रसिद्ध केलेली प्रारूप परियोजना, केलेल्या नेमणुका, मंजुरीसाठी सादर केलेल्या कोणत्याही परियोजना किंवा केलेले विनियम यांचा अंतर्भाव आहे.) या अधिनियमाखाली अशा नवीन मंडळाने कायदेशीरपणे केलेली गोष्ट किंवा कार्यवाही, केलेल्या नेमणुका, दिलेला निदेश, मान्य केलेल्या, प्रसिद्ध केलेल्या, सादर केलेल्या परियोजना किंवा केलेले विनियम आहेत असे मानण्यात येईल आणि या अधिनियमाच्या तरतुदी त्यास लागू होतील आणि याप्रमाणे निरसित केलेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमाखाली मंजूर केलेली आणि प्रथम उल्लेख केलेल्या मंडळाने पार पाडावयाची कोणतीही परियोजना ही नवीन मंडळ, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार पार पाडील.

(३) याप्रमाणे निरसित केलेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमाखाली तयार केलेल्या कोणत्याही विवरणपत्रात आणि हक्कदारपत्रात व ग्रामलेख्यात किंवा इतर अभिलेखात केलेल्या नोंदी या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये तयार केलेले विवरणपत्र आणि केलेल्या नोंदी आहेत असे मानण्यात येईल.

(४) अशा कोणत्याही परियोजनेखाली किंवा विवरणपत्राखाली किंवा याप्रमाणे निरसित झालेल्या कोणत्याही अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींन्वये संपादन केलेला कोणताही हक्क, उपार्जित केलेला कोणताही विशेषाधिकार किंवा पत्करलेले कोणतेही आबंधन किंवा दायित्व हे, जणू कांही या अधिनियमाखाली संपादन करण्यात, उपार्जित करण्यात किंवा पत्करण्यात आलेले असावे त्याप्रमाणे चालू राहील. आणि ते या अधिनियमाच्या तरतुदींनुसार अंमलात आणता येईल :

परंतु, सौराष्ट्र जमीन सुधारणा परियोजना अधिनियम, १९५४ याच्या निरसनापूर्वी केलेले कोणतेही कृत्य हे, त्या अधिनियमाच्या कलम १३ खाली शिक्षा होण्याजोगा अपराध असेल तर, त्याच्या संबंधातील कोणतीही कार्यवाही ही, जणू काही मुंबई जमीन सुधारणा परियोजना (व्याप्ती वाढविणे व सुधारणा) अधिनियम, १९५८ हा पारित करण्यात आला नसावा त्याप्रमाणे दाखल करता येईल, चालू ठेवता येईल किंवा निकालात काढता येईल. १९५४ चा सौराष्ट्र १९. १९५८ चा मुंबई ३०.

---

[1] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३०, कलम १८ अन्वये कलम २८-अ समाविष्ट करण्यात आले.

(५) याप्रमाणे निरसित झालेल्या अधिनियमांपैकी, कोणत्याही अधिनियमाखाली केलेली कोणतीही नेमणूक, काढलेली अधिसूचना, दिलेला आदेश, केलेला नियम, काढलेली नोटीस, दिलेला अहवाल किंवा केलेले प्रत्यायोजन हे, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर या अधिनियमाखाली केलेली नेमणूक, काढलेली अधिसूचना, दिलेला आदेश, केलेला नियम, काढलेली नोटीस, दिलेला अहवाल किंवा केलेले प्रत्यायोजन याअन्वये अधिक्रांत होईपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील.

१९७९ चा महाराष्ट्र ११.

**२९.** या अधिनियमातील कोणतीही तरतूद ज्या जमिनींच्या संबंधात [१][महाराष्ट्र खार जमिनी विकास अधिनियम, १९७९ खाली] परियोजना मंजूर झाली असेल किंवा मंजूर करण्यात आलेली असेल [१][किंवा तयार करण्यात आल्याचे मानण्यात आले असेल] अशा खार जमिनींना लागू असणार नाही. खार जमिनींची व्यावृत्ती.

[१] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ७ अन्वये " मुंबई खार जमीन अधिनियम, १९४८ खाली " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

शामुना-एच-२०१४-भासंमरामुं-३-२०१३-६०४२ प्रती-पीसी४*

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे –

**संचालक**
शासन मुद्रण लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
महाराष्ट्र राज्य
(प्रकाशन शाखा), **नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००४**
**दूरध्वनी :** ३६३१४३३, ३६३१७३३, ३६३१७९९ आणि ३६३१५३७

**पर्यवेक्षक** •
शासकीय ग्रंथागार
**(केंद्र शासनाच्या व महाराष्ट्र राज्य शासनाच्या प्रकाशनाकरिता)**
**(फक्त स्थानिक विक्रीकरिता)**
**युसुफ बिल्डिंग, दुसरा मजला, खो. नं. २१,**
**वीर नरीमन रोड (हुतात्मा चौकाजवळ),**
**मुंबई ४०० ००१**
**दूरध्वनी :** २०४९५९४

**व्यवस्थापक** •
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
**सुसी सोराबजी मार्ग,**
**शासकीय फोटोझिंको मुद्रणालय आवार, पुणे ४११ ००१**
**दूरध्वनी :** ६६८८५९

**व्यवस्थापक** •
शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
**सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१,**
**दूरध्वनी :** ५२२६१५

**पर्यवेक्षक** •
शासकीय ग्रंथागार
**शहागंज (गांधी चौकाजवळ)**
**औरंगाबाद ४३१ ००१**
**दूरध्वनी :** २५५२५
आणि
**महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**